ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

# Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे १९८९ मध्ये स्थापिलेले)**

(Established by Government of Maharashtra in the year 1989)

# व्यवस्थापन मंडळ बैठक

# Board of Management Meeting

## कार्यवृत्त

## Minutes of Meeting

**बैठक क्रमांक** : 202
(Meeting Number)

**स्थळ(Venue)** : विद्यापीठ मुख्यालय सभागृह,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक ४२२२२२
Administrative Building Meeting Hall
Yashwantrao Chavan Maharashtra Open University,
Nashik, 422 222

**वार व दिनांक** : गुरूवार, दिनांक 12 जून 2025
**(Day and Date)** : Thursday, 12 June 2025

**वेळ** (Time) : सकाळी 11.30 वाजता (11.30 am)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

---

## 202 वी व्यवस्थापन मंडळ बैठक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची 202 वी बैठक (ऑनलाईन व ऑफलाईन) पद्धतीने गुरूवार, दिनांक 12 जून 2025 रोजी सकाळी 11.30 वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | अध्यक्ष |
| 02 | मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, मा. प्र-कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सदस्य |
| 03 | मा. डॉ. संजय भावे, मा. कुलगुरू बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 04 | मा. प्रा. वाल्मिक सरवदे, प्र-कुलगुरू डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजी नगर | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 05 | मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण यांचे प्रतिनिधी श्री. अनिल गावित नाशिक | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 06 | मा. प्रा. एन. के. दास, स्कूल ऑफ एज्युकेशन, इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिवर्सिटी, नवी दिल्ली | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 07 | मा. श्री. नरेंद्र जोशी, अंबेजोगाई | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 08 | मा. डॉ. संजीवनी महाले, संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सदस्य |
| 09 | मा. श्री. भटुप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | निमंत्रित सदस्य |
| 10 | मा. डॉ. गोविंद कतलाकुटे, वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | निमंत्रित सदस्य |
| 11 | श्री. दिलीप भरड, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सचिव |

पुढील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. सचिव, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 02 | मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 03 | मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 04 | मा. संचालक, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 05 | मा. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |

| अनु.क्रमांक<br>Subject No. | | तपशील<br>Details |
|---|---|---|
| 202.1 | | **स्वागत**<br>मा. व्यवस्थापन मंडळाचे सचिव श्री. दिलीप भरड यांनी ऑफलाईन तसेच ऑनलाईन पद्धतीने उपस्थित सर्व सदस्यांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. |
| 202.2 | 202.2.1 | **दिनांक 28 एप्रिल 2025 रोजी झालेल्या 201 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** दिनांक 28 एप्रिल 2025 रोजी झालेल्या 201 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त सचिव श्री. भरड यांनी वाचून दाखविले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 202.2.2 | **दिनांक 28 एप्रिल 2025 रोजी झालेल्या 201 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** दिनांक 28 एप्रिल 2025 रोजी झालेल्या 201 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचा कार्यवाहीचा अहवाल सचिव श्री. भरड यांनी वाचून सभागृहाला अवगत करून दिले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 202.3 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 202.3.1<br>आस्थपना कक्ष | **श्री. किशोर विश्वनाथ मोरे, सहायक यांच्या जन्मतारीख बदलाबाबतची दुरूस्ती करणेबाबतचा विषय मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी :** श्री. किशोर मोरे यांनी दि. 10.02.2020च्या अर्जानुसार त्यांची जन्मतारीख 02.05.1974 ऐवजी 02.05.1970 करणेबाबतची विनंती केली आहे. याबाबतचा आस्थापना कक्षाने सादर केलेली टिपणी मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** या विषयाबाबतचे सविस्तर विवेचन सभागृहापुढे सादर करण्यात आले. श्री. किशोर मोरे यांनी त्यांच्या जन्मतारीख बदलाबाबतचे सेवाविषयक सर्व दस्तऐवज सादर केले आहेत. श्री. किशोर मोरे यांनी सादर केलेल्या दस्तऐवजानुसार बदल करावयाच्या जन्मतारखेनुसार पूर्वीच्या जन्मतारखेपेक्षा 4 वर्ष आधी सेवानिवृत्त होणार आहे. त्यामुळे विद्यापीठावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही उलट त्यांना 4 वर्षे वेतन द्यावे लागणार नाही. श्री. किशोर विश्वनाथ मोरे यांनी मागणीनुसार आणि सादर दस्तऐवजानुसार श्री. किशोर विश्वनाथ मोरे यांची जन्मतारीख 02.05.1974 ऐवजी 02.05.1970 करण्यास सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता दिली. |
| | 202.3.2<br>आस्थापना कक्ष | **नियोजन अधिकारी हे पद प्रतिनियुक्तीवर भरणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर ...**<br>**टिपणी :** विद्यापीठातील नियोजन अधिकारी हे पद रिक्त आहे. सदर रिक्त पद भरणेकरिता विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 ऑफ 1993) व इतर अनुषंगिक संबंधित तरतूदीनुसार प्रतिनियुक्तीच्या पद्धतीने विहित प्रक्रियेचा अवलंब करून नियुक्ती करणेसाठीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर .....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विद्यापीठाच्या शासनमान्य पदांमधील नियोजन अधिकारी या पदावर नियुक्त केलेले नियोजन अधिकारी यांचा कार्यकाळ संपल्यापासून हे पद रिक्त आहे. या पदाचा कार्यभार विद्यापीठातील शिक्षकांना अतिरिक्त म्हणून देण्यात येतो. विद्यापीठात शिक्षकांची संख्या अत्यंत कमी असल्याने नियोजन अधिकारी या पदाचा कार्यभार करार पद्धतीने नियुक्त असलेल्या सेवानिवृत्त शिक्षक असलेल्या शिक्षकाकडे देण्यात आला आहे. सध्या विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्राचे संचालक यांचेकडे नियोजन अधिकारी पदाचाही अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. त्यामुळे एकाच व्यक्तीवर दोन्ही महत्त्वाच्या कामांची जबाबदारी पडते. सबब नियोजन अधिकारी हे पद प्रतिनियुक्तीवर भरणे गरजेचे आहे असा प्रस्ताव सादर केला. या प्रस्तावास विद्यापीठाच्या या मान्य पदाच्या अटी व शर्ती तसेच मान्य वेतन/ भत्ते यांचा विचार करावा अशा सुचनेसह सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता दिली. त्याचप्रमाणे वित्तीय देयतेसही सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता दिली. |

| | | |
|---|---|---|
| | 202.3.3<br>विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्र | **बाबुराव बागुल कथा पुरस्कार सन 2023च्या मान्यतेबाबतचा विषय मा. व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी :** बाबुराव बागुल कथा पुरस्कार सन 2023 निवड समिती बैठक दिनांक 06.05.2025 रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत श्री. विवेक वसंत कडू यांच्या 'चार चपटे मासे' या कथासंग्रहास बाबुराव बागुल कथा पुरस्कार देण्याबाबतचा विषय मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर.....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विद्यापीठामार्फत दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्कारांसाठी नियमावली तयार केली आहे. तसेच विविध पुरस्कारांसाठी संबंधित क्षेत्रांतील व्यक्तींची समिती गठीत केली जाते. समितीकडून निकषांनुसार व्यक्तींच्या नावांची शिफारस करण्यात येते. समितीने बाबुराव बागूल या पुरस्कारासाठी 'श्री. विवेक वसंत कडू यांच्या 'चार चपटे मासे' या कथासंग्रहास बाबुराव बागुल कथा पुरस्कार देण्याच्या शिफारशीस सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता दिली. |
| | 202.3.4<br>वित्त विभाग | **दि. 31 मे 2025 रोजी झालेल्या वित्त समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी :** दि. 31 मे 2025 रोजी वित्त समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** दि. 31 मे, 2025 रोजी झालेल्या वित्त समितीच्या इतिवृत्तावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार विषय क्र. 06 व विषय क्र. 08 यामध्ये किरकेळ दुरुस्ती ही वित्त समितीच्या दि. 10 जुन, 2025 च्या बैठकीतील इतिवृत्तात केलेली आहे. त्यामुळे सदर इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 202.3.5<br>वित्त विभाग | **दि. 10 जून 2025 रोजी झालेल्या वित्त समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी :** दि. 10 जून 2025 रोजी वित्त समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** दि. 10 जुन, 2025 रोजी झालेल्या वित्त समिती बैठकीचे इतिवृत्तावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यात दि. 31 मे, 2025 रोजीच्या बैठकीतील विषय क्र. 06 व 08 मध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करून मान्यता प्रदान प्रदान केली आहे. त्यामुळे सदर इतिवृत्तासही सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 202.3.6<br>स्कूल ऑफ डिजीटल एज्यु. | **प्रो. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्रामार्फत प्रो. राम ताकवले मेमोरिअल लेक्चर दरवर्षी आयोजन करणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी :** महाराष्ट्रात दूर शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवून महाराष्ट्रातील शिक्षणापासून वंचितांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. तसेच त्यांनी ऑनलाईन शिक्षण, डिजिटल शिक्षण यामध्येही प्रचंड काम केले आहे. त्यांच्या 13 मे या पुण्यतिथी निमित्त दरवर्षी व्याख्यान आयोजित करण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चाची तरतूद स्वतंत्र लेखाशिर्षातून करण्याचा विषय मा. व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** या व्याख्यानमालेसाठी समिती गठीत केली. विद्यापीठामार्फत देण्यात येणाऱ्या पुरस्कारांसाठी जी नियमावली आहे त्याच धर्तीवर या समिती सदस्यांनी या व्याख्यानमालेसंदर्भात नियमावली तयार केली. समितीने शिफारस केलेल्या नियमावलीस सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता दिली. तसेच याबाबत असाही ठराव करण्यात आला की या व्याख्यानमालेसाठी दरवर्षी येणाऱ्ा खर्च करण्यासाठी Endowment Fund तयार करण्यात यावा. त्यात काही रक्कम जमा करण्यात यावी. जमा व्याज्याच्या रकमेतून हा खर्च करण्यात यावा. दरवर्षी साधारण किती रक्कम अपेक्षित आहे याचा अभ्यास करून Endowment Fund मध्ये किती रक्कम जमा करावी ह्याबाबत या व्याख्यानमालेसाठी गठीत केलेल्या समितीकडून शिफारस मागविण्यात यावी आणि समितीने सुचविलेली शिफारस मा. व्यवस्थापन मंडळाच्या पुढील बैठकीत प्रस्तावित करण्यात यावी अशी सर्वानुमते शिफारस करण्यात आली. |
| 202.4 | | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय** |
| | 202.4.1<br>अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र | **विद्यापीठाचा वर्धापनदिन सोहळा साजरा करण्यासाठी केलेल्या शिफारशी मान्यतेचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर ....**<br>**टिपणी :** 1 जुलै हा विद्यापीठाचा वर्धापन असतो. दरवर्षी हा वर्धापन दिन अत्यंत साध्या पद्धतीने साजरा केला जातो. परंतु हा दिवस विद्यापीठाशी संबंधित सर्वांच्या आनंदाचा दिवस असतो. त्यामुळे |

या दिवशी वेगवेगळे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. विद्यापीठासाठी काम करणाऱ्यांच्या योगदानाप्रती सन्मानित करण्यात यावा अशी संकल्पना पुढे आली. याला मुर्त रूप देण्यासाठी सुकाणू समिती गठीत करण्यात आली.

या समितीने समाजात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या विविध क्षेत्रांतील व्यक्तींचा आणि विद्यापीठाचे शिक्षक व कर्मचारी यांनी विद्यापीठात सेवा केली आहे. विद्यापीठासाठी विविध विभागांमधील विविध अभ्यासकेंद्रे तेथील समन्वयक यांच्या मार्गदर्शनाने विद्यापीठाचे कार्य खऱ्या अर्थाने समाजापर्यंत पोहोचते. त्यामुळे अशा उत्कृष्ट व्यक्तींचा सन्मान वर्धापन दिनी करावा अशी कल्पना मांडली केली. पुढील पुरस्कार आणि पुरस्काराचे स्वरूप कसे असावे याची चर्चा होऊन पुढील पुरस्कार आणि पुरस्कारांचे स्वरूप यांची शिफारस केली.

- यश जीवनगौरव पुरस्कार – पुढील क्षेत्रातील प्रत्येकी एक असे एकूण पाच पुरस्कार
  1) शेती व ग्रामविकास
  2) शिक्षण व संशोधन
  3) उद्योग तंत्रज्ञान
  4) समाजकार्य व पर्यावरण
  5) साहित्य
- उत्कृष्ट शिक्षक (मुख्यालय प्रांगण) पुरस्कार – एक उत्कृष्ट शिक्षक
- उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार (मुख्यालय प्रांगण) - एक उत्कृष्ट कर्मचारी
- उत्कृष्ट अभ्यासकेंद्र पुरस्कार - प्रत्येक विभागातील एक अभ्यासकेंद्र
- उत्कृष्ट अभ्यासकेंद्र समन्वयक पुरस्कार – प्रत्येक विभागातील एक अभ्यासकेंद्र समन्वयक
- सर्वाधिक नोंदणी असलेले अभ्यासकेंद्र – प्रत्येक विभागातील एक अभ्यासकेंद्र
- सर्वाधिक नोंदणी असलेला विभाग – एक विभागीय संचालक

पारितोषिके/पुरस्कार रक्कम व स्वरुप

| पुरस्कार | संख्या | रक्कम (प्रत्येकी) | स्वरुप |
|---|---|---|---|
| यश जीवनगौरव पुरस्कार | 05 | 51,000.00 | शाल, मानपत्र, स्मृतिचिन्ह, गुच्छ |
| उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (मुख्यालय प्रांगण) | 01 | 11,000.00 | शाल, स्मृतिचिन्ह, गुच्छ |
| उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार (मुख्यालय प्रांगण) | 01 | 5,000.00 | शाल, स्मृतिचिन्ह, गुच्छ |
| उत्कृष्ट अभ्यासकेंद्र पुरस्कार | 08 | 11,000.00 | शाल, स्मृतिचिन्ह, गुच्छ |
| उत्कृष्ट अभ्यासकेंद्र समन्वयक पुरस्कार | 08 | 5,000.00 | शाल, स्मृतिचिन्ह, गुच्छ |
| सर्वाधिक नोंदणी असलेले अभ्यासकेंद्र | 08 | 11,000.00 | शाल, स्मृतिचिन्ह, गुच्छ |
| सर्वाधिक नोंदणी असलेले विभागीय केंद्र | 01 | 11,000.00 | शाल, स्मृतिचिन्ह, गुच्छ |

या समितीच्या बैठकीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळापुढे कार्योत्तर मान्यतेस्तव सादर....

**व्यवस्थापन मंडळ ठराव :** मा. कुलगुरू तथा अध्यक्ष यांनी सुकाणू समितीच्या इतिवृत्ताबद्दल मा. व्यवस्थापन मंडळाला विवेचनाद्वारे अवगत करून दिले.

या संकल्पनेचे सर्व सन्माननीय सदस्यांनी स्वागत केले आणि समितीने प्रस्तावित केलेली शिफारस तसेच पुरस्कार आणि पुरस्काराचे स्वरूप यांना सर्व सन्माननीय सदस्यांनी कार्योत्तर मान्यता प्रदान केली.

| | | |
|---|---|---|
| | 202.4.2<br>बांधकाम कक्ष | **विद्यापीठातील ग्रंथ भांडार इमारतीसमोरील जागेवर मा. स्वर्गीय प्रा. राम ताकवले स्मृती उद्यान येथे स्वर्गीय प्रा. राम ताकवले यांचा अर्धाकृती पुतळा बसविण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर ...**<br>**टिपणी :** स्वर्गीय प्रा. राम ताकवले सर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू होते. त्यांच्या संकल्पनेतून व त्यांच्या कार्यकाळात विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्यांनी दोन वेळा कुलगुरूपद भूषवून विद्यापीठासाठी मोठे योगदान दिले. त्यांच्या स्मृतीतून त्यांचे कार्य विद्यापीठासाठी सतत प्रेरणादायी ठरावे या उद्देशाने त्यांचे स्मृती उद्यान तयार करावे आणि त्यात त्यांचा अर्धाकृती पुतळा उभारावा यासाठी बांधकाम समितीत ठराव करण्यात आला. सदर ठराव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर ...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** स्वर्गीय प्रा. राम ताकवले सरांच्या मुक्त शिक्षणातील भरीव योगदानाबाबत सर्व सन्माननीय सदस्यांनी आदर व्यक्त केला. मुक्त विद्यापीठाद्वारे त्यांचा अर्धाकृती पुतळा उभारून त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करत आहे याचे सर्व सन्माननीय सदस्यांनी स्वागत केले.<br>मा. कुलगुरूंनी पुतळा अनावरणासाठी विद्यापीठाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून भारताचे अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर हे कार्यक्रमासाठी उपस्थित रहाणार असल्याचे विशद केले. सर्व सन्माननीय सदस्यांना 1 जुलैच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमासाठी निमंत्रित केले.<br>सर्व सन्माननीय सदस्यांनी मा. कुलगुरूंच्या निमंत्रणाचा स्विकार केला आणि विद्यापीठाचे अभिनंदन करून स्वर्गीय राम ताकवले यांचा अर्धाकृती पुतळा विद्यापीठ प्रांगणात बसवण्यासाठी मान्यता प्रदान करून शुभेच्छा दिल्या, सदर प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला. |
| | 202.4.3<br>सदस्य मा. व्यवस्थापन मंडळ | **डॉ. सुनंदा मोरे आणि डॉ. ऋचा गुजर ह्यांना जादा अदा झालेली रक्कम विद्यापीठाने वसूल करू नये याबाबतचा स्थगिती प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी :** डॉ. सुनंदा मोरे 33 वर्षांपासून आणि डॉ. ऋचा गुजर 30 वर्षांपासून विद्यापीठाच्या कर्मचारी आहेत. CAS अंतर्गत त्यांना 'सहयोगी प्राध्यापक' म्हणून पदोन्नती देण्यात आली होती. परंतु मा. उच्च व तंत्रशिक्षण यांनी या दोन्ही सहयोगी प्राध्यापिकांनी सहयोगी प्राध्यापक पदासाठीचे किमान अर्हतेचे दस्तऐवज सादर केले नाहीत सबब त्यांना दिलेली 'सहयोगी प्राध्यापक' पदाच्या वेतनश्रेणी ऐवजी 'सहायक प्राध्यापक' पदाची वेतनश्रेणीचा अवलंब करण्यात याव्या अशा सूचना केल्या. सबब डॉ. सुनंदा मोरे आणि डॉ. ऋचा गुजर यांना अदा झालेले अतिरिक्त वेतनाच्या वसुलीबाबतचे पत्र विद्यापीठाने त्यांना दिले आहे. त्यांनी विद्यापीठात दिलेल्या योगदानाचा आणि अतिरिक्त कामाचा विचार करून विद्यापीठाने त्यांच्याकडील अतिरिक्त वेतनाच्या वसुलीची रक्कम वसूल करू नये याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** डॉ. सुनंदा मोरे आणि डॉ. ऋचा गुजर यांना CAS अंतर्गत दिलेली सहयोगी प्राध्यापकाची पदोन्नती व वेतनश्रेणी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने अर्हता पूर्ण करत नसल्याने मान्य केली नाही. सबब त्यांना सहायक प्राध्यापक पदाचे वेतन देय असल्याबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाने विद्यापीठास कळविले. त्यामुळे त्यांना सहयोगी प्राध्यापक पदाच्या वेतनापोटी अदा झालेली अतिरिक्त वेतनाची रक्कम वसूल करण्याबाबत विद्यापीठाने डॉ. सुनंदा मोरे आणि डॉ. ऋचा गुजर यांना अवगत केले.<br>याबाबत डॉ. सुनंदा मोरे आणि डॉ. ऋचा गुजर यांनी करिअर ॲडव्हान्समेंट योजनेअंतर्गत सहयोगी प्राध्यापकाचे पद आणि वेतन मिळणेबाबत तसेच अतिप्रदान रक्कम वसुलीस स्थगितीबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. उच्च न्यायालयाने त्यांच्या याचिकेवर निकाल लागेपर्यंत 'वसुलीस स्थगिती' द्यावी असे निर्देश दिले. त्याचे विद्यापीठ पालन करीत आहे. सध्या या दोन्ही याचिका न्यायप्रलंबित असून निर्णयाच्या अंतिम टप्प्यात आहेत.<br>वरील विवेचनानंतर मा. व्यवस्थापन मंडळाचे सदस्य मा. गावित यांनी सद्यस्थितीत सदर प्रकरण मा. उच्च न्यायालयाच्या कार्यकक्षेत असल्याने, न्यायप्रविष्ट प्रकरणांबाबत निर्णय घेण्याचा अधिकार मा. व्यवस्थापन मंडळाला नसल्याने हा विषय चर्चेसाठी घेऊ नये असे सुचित केले. उच्च न्यायालयाच्या निकालाची अंमलबजावणी करण्याची शिफारस सर्व सन्माननीय सदस्यांनी केली. |
| | 202.4.4<br>अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र | **विविध संस्थांशी केलेल्या सामंजस्य करारांना मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी :** विद्यापीठामार्फत बदलत्या काळानुरुप आणि भविष्यातील रोजगाराच्या संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होतील अशा प्रकारचा विचार करून संबंधित क्षेत्रांत काम करणाऱ्या विविध संस्थांबरोबर |

| | | |
|---|---|---|
| | | सामंजस्य करार करण्यात येत आहेत. त्यातीलच पुढील काही संस्थांशी केलेले सामांजस्य करार मा. व्यवस्थापन मंडळाला अवगत करून मान्येतेस्तव सादर ...<br>1) PhysisWallah (PW), New Delhi<br>2) Jaguars Defencese Academy, Nashik<br>3) Bhaktivedanta Research Center, Kolkatta<br>4) Jnana Prabodhini Samshodhan Sanstha Pune<br>5) Vivasvat Revolutions Ltds, Mumbai<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : मा. व्यवस्थापन मंडळासमोर सादर कलेल्या वरील सर्व सामंजस्य करारांना तसेच **'वावर'** आणि **'DOT INCORPORATION, South Korea'** यांच्यासोबत होणाऱ्या सामंजस्य करारांना सर्व सन्माननीय सदस्यांनी सर्वानुमते मान्यता दिली. |
| | 202.4.5<br>आस्थापना कक्ष | **ॲग्रीकल्चर स्किलींग आणि स्कील एज्युकेशन या दोन क्षेत्रांतील काम विद्यापीठात सुरू करण्यासाठी या क्षेत्रांतील तज्ज्ञ व्यक्तींची Professor of Practice (PoP) म्हणून नेमणूक करण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ स्किल एज्युकेशनच्या माध्यमातून विविध क्षेत्रांत संबंधित स्कीलचा उपयोग करून विविध शैक्षणिक प्रयोग राबवत आहे. वेगवेगळ्या स्कीलचा वापर करणाऱ्यांना नोकरी तसेच व्यवसायाच्या संधी उपलब्ध होतील या व्यापक विचाराने शेतीशी संबंधित ॲग्रीकल्चर स्किलींग आणि वेगवेगळ्या क्षेत्रांतील स्कीलची संबंधित स्कील एज्युकेशन या क्षेत्रांत काम करण्यासाठी या क्षेत्रांतील तज्ज्ञ आणि अनुभवी व्यक्तींची गरज आहे. त्यामुळे या दोन क्षेत्रांसाठी प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस (PoP) ची पदे करारावर नेमणूक करण्याचे प्रस्तावित आहे. प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीसची तीन पदे यापूर्वी मा. व्यवस्थापन मंडळाने मंजूर केलेल्या निकषांनुसार नियुक्त करण्यात आलेली आहे. त्याच निकषांच्या आधारे या दोन क्षेत्रांतील तज्ज्ञ व्यक्तींची PoP म्हणून नियुक्त करण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : मा. अध्यक्ष तथा मा. कुलगुरू यांनी याविषयासंदर्भातील पार्श्वभूमी विषद केली. या क्षेत्रांमुळे युवकांना स्कीलच्या आधारे विविध संधी निर्माण होतील. सदर प्रस्तावाची गरज लक्षात घेऊन सर्व सन्माननीय सदस्यांनी सर्वानुमते मान्यता दिली. |
| | 202.4.6<br>सभा व दप्तर कक्ष | **कुलसचिव, वित्त अधिकारी व परीक्षा नियंत्रक या पदांच्या परिनियमात बदल करणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अधिनियम, 1989 मधील अ.क्र. 1 ते 4 अन्वये संवैधानिक अधिकाऱ्यांची पदे मान्य करण्यात आली आहेत. सदर पदे विद्यापीठ स्थापनेच्या वेळी करण्यात आलेल्या अधिनियमात समाविष्ट करण्यात आली होती. या पदांमध्ये कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव, वित्त अधिकारी व परीक्षा नियंत्रक या पदांचाही समावेश आहे. कुलसचिव, वित्त अधिकारी व परीक्षा नियंत्रक या पदांच्या वेतनश्रेणी, सेवेच्या अटी व शर्ती, निवडीची कार्यपद्धती, सेवानिवृत्ती वेतन व सेवानिवृत्ती नंतरचे इतर आर्थिक लाभ जसे की, रजा रोखीकरण, निवृत्ती वेतन अंशदान व रजा अंशदान महाराष्ट्र नागरी सेवा नियमांमधील तरतुदींनुसार व प्रचलित शासन निर्णयाप्रमाणे शासनाकडे भरणा करणे, इत्यादींबाबत परिनियमात समावेश करण्यात आला आहे. कालानुरुप या पदांच्या परिनियमात दुरुस्ती करण्याचा विषय मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अधिनियम, 1989 मधील अ.क्र. 1 ते 4 अन्वये संवैधानिक अधिकारी असलेल्या कुलसचिव, वित्त अधिकारी व परीक्षा नियंत्रक या पदांच्या वेतनश्रेणी, सेवेच्या अटी व शर्ती, निवडीची कार्यपद्धती, सेवानिवृत्ती वेतन व सेवानिवृत्ती नंतरचे इतर आर्थिक लाभ जसे की, रजा रोखीकरण, निवृत्ती वेतन अंशदान व रजा अंशदान महाराष्ट्र नागरी सेवा नियमांमधील तरतुदींनुसार व प्रचलित शासन निर्णयाप्रमाणे शासनाकडे भरणा करणे, इत्यादींबाबतच्या तत्कालिन परिनियमात दुरुस्ती करण्याच्या प्रस्तावास मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता दिली. |
| | 202.4.7<br>आस्थापना कक्ष | **विद्यापीठाच्या संवैधानिक अधिकारी मा. कुलगुरू, मा. प्र. कुलगुरू तसेच कुलसचिव, वित्त अधिकारी व परीक्षा नियंत्रक या पदांचा दिनांक 23/12/2020च्या अधिसूचनेत समावेश करणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मान्यतेस्तव सादर ....**<br>**टिपणी** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ कायद्याअंतर्गत मा. कुलगुरू, मा. प्र. कुलगुरू तसेच कुलसचिव, वित्त अधिकारी व परीक्षा नियंत्रक या संवैधानिक पदांचा प्रशासकीय पदांमध्ये अंतर्भाग केला आहे. ही पदे अस्तित्वात आल्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र शासनाने लागू केलेल्या वेतनश्रेण्या/ पे मॅट्रीक्स त्या त्या वेळी या पदांना लागू करण्यात आल्या |

| | | |
|---|---|---|
| | | आहेत. परंतु मुक्त विद्यापीठासाठी शासनाने निर्गमित केलेल्या 23/12/2020 च्या सातव्या वेतन आयोगाच्या अधिसूचनेत विद्यापीठातील कुलसचिव, वित्त अधिकारी व परीक्षा नियंत्रक या प्रशासकीय पदांचा समावेश नसल्याने सातव्या वेतन आयोगाचे लाभ या पदांवरील व्यक्तींना देण्यासाठी सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी या पदांचा समावेश नसल्याबाबतची त्रुटी दर्शविली आहे. सातव्या वेतन आयोगाच्या 23/12/2020 च्या निर्गमित अधिसुचनेत कुलसचिव, वित्त अधिकारी व परीक्षा नियंत्रक ह्या पदांचा समावेश करून सुधारित अधिसूचना निर्गमित करण्याबाबत शासनास पत्रव्यवहार करावा लागेल. शासनाकडे करावयाच्या पत्रव्यवहारासाठीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर ...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कायद्यामध्ये अंतर्भूत संवैधानिक पदावर कार्यरत कुलसचिव, वित्त अधिकारी व परीक्षा नियंत्रक या पदांचा शासनाने प्रशासकीय पदांसाठी निर्गमित केलेल्या 23/12/2020 च्या सातव्या वेतन आयोगाच्या अधिसूचनेत समावेश करण्यासाठी शासनाकडे करावयाच्या पत्रव्यवहारास मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान करण्यात आली. तसेच मा. कुलगुरू आणि प्र-कुलगुरू या शैक्षणिक पदांसाठीच्या वेतन आयोगाच्या निर्गमित झालेल्या योग्य त्या शासन निर्णयात/अधिसूचनेत समावेश करण्याबाबत शासनाकडे पाठवावयाच्या पत्रात समावेश करावा अशी सूचना केली. शासनाला पाठवावयाच्या प्रस्तावात विद्यापीठाच्या दि. 28.2.2024च्या व्यवस्थापन मंडळ बैठकीत ठराव क्र. 192.4.1 नुसार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ कायदा 1989 मध्ये नमूद संवैधानिक पदांवर शासनमान्य वेतन अनुदानित व सेवानिवृत्ती वेतनार्ह पदांवर कार्यरत असणारे अधिकारी संवैधानिक पदांवर रुजू झाल्यास अशा अधिकाऱ्यांना पण शासनाची सेवानिवृत्ती वेतन योजना लागू राहील. तसेच सेवानिवृत्तीच्या अनुषंगाने रजारोखीकरण, निवृत्तीवेतन अंशदान व रजा रोखीकरणाचे अंशदान, इत्यादी तसेच इतर लाभ मिळण्यास सदर संवैधानिक अधिकारी पात्र असतील असा ठराव केला आहे त्याचाही उल्लेख करण्यात यावा अशी सूचना केली. |
| | 202.4.8<br>आस्थापना कक्ष | **विद्यापीठातील प्रशासकीय करारावर एकत्रित वेतनावर नियुक्त केलेल्या श्री. राजेंद्र वासुदेव मांडगे यांना पुढील 1 वर्षाच्या (6-6 महिन्यांच्या) कालावधीकरीताची मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर ....**<br>**टिपणी :** श्री. राजेंद्र वासुदेव मांडगे यांना विद्यापीठाच्या कायद्याअंतर्गत मा. कुलगुरूंच्या मान्यतेने एकत्रित वेतनावर 2 वर्षांच्या नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आला आहे. विद्यापीठ परिनियमानुसार 2 वर्षानंतर पुढे 1 (वर्ष 6-6 महिन्यांच्या) मुदतवाढीसाठीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** श्री. राजेंद्र वासुदेव मांडगे यांची त्यांच्या नियमित सेवापुर्तीनंतर विद्यापीठाच्या परिनियमातील तरतुदीनुसार मा. कुलगुरूंच्या मान्यतेच्या अधिन राहून करारावरील नियुक्तीची मुदत 11.06.2025 रोजी समाप्त झाली आहे. नवीन पद भरतीसाठी शासनाने मंजुरी दिलेली नाही तसेच विद्यापीठातील अपुरे मनुष्यबळ यांमुळे विद्यापीठातून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना पुन्हा करारावर प्रशासकीय नेमणूक करण्यात येते. श्री. मांडगे हे वित्त विभागात वित्त अधिकारी यांचे स्वीय सहायक म्हणून काम करत आहेत. त्यांच्या कामाची वित्त विभागाला गरज आहे. त्यामुळे परिनियमाच्या आधारे मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेच्या अधीन त्यांना 1 वर्ष (6-6 महिन्यांसाठी) मुदतवाढीच्या प्रस्तावास आणि त्यांना रु. 25,000.00 + रु. 5,000.00 (अतिरिक्त भत्ता) अशा एकूण रु. 30,000.00 इतक्या एकत्रित वेतनास मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मंजुरी दिली. |
| | | मा. व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष तथा कुलगुरू यांनी या बैठकीचे प्रयोजन विद्यापीठाचा वर्धापन दिन कार्यक्रम रुपरेषा आणि मा. स्वर्गीय राम ताकवले सरांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या अनावरण असल्याचे नमूद केले. तसेच या कार्यक्रमासाठी मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी उपस्थित रहावे असे आमंत्रण दिले. |
| | | **वरील सर्व विषय याच बैठकीत वाचून याच बैठकीत मान्य करण्यात आले. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपन्न झाली.** |

**कुलगुरू तथा अध्यक्ष**
**व्यवस्थापन मंडळ**

**कुलसचिव तथा सचिव**
**व्यवस्थापन मंडळ**